**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)**

मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर पिन.४२३१०९

(फोन नं.०२४२३ - २५८५००/२५८७७१/२५८७७२) फॅक्स नं.२५८८७०

(Website - www.sai.org.in, Email – purchase@sai.org.in)

**जाहीर फेर ई-निविदा (दुस-यांदा)**

श्री साईबाबा संस्थानचे साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकरिता **वुलन ब्लॅंकेट** खरेदीकामी नामांकित पुरवठाधारक, वितरक, उत्पादक यांचेकडून ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

**निविदा किंमत** – रु.३,३००/- (रु.तीन हजार तीनशे मात्र)
**बयाणा रक्कम** – रु.५५,०००/- (रु. पंचावन्न हजार मात्र)

१. ई-निविदा व ई-निविदेबाबतच्या अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२. निविदा ऑनलाईन डाऊनलोडींग व अपलोडींगसाठी दि. १४/ ०१ /२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून ते दि. ०४ / ०२/२०१९ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहतील.

३. **निविदा फी व बयाणा रक्कम शासनाच्या** www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन भरावी.

४. निविदाधारकाने सर्व कागदपत्रे ऑनलाईन सादर करावयाची आहेत. Hard Copy मध्ये सादर केलेली कागदपत्रे विचारात घेतली जाणार नाहीत.

५. शक्य झाल्यास तांत्रिक निविदा दि.०८ / ०२/२०१९ रोजी उघडण्यात येतील.

कोणतीही निविदा अंशतः/ पुर्णपणे स्वीकारणे अथवा नाकारणेचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे.

**(श्रीमती. रुबल अग्रवाल, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

## शिरडी ४२३ १०९.

## तालुका-राहाता, जिल्हा-अहमदनगर


दुरध्वनी क्रमांक (९५-२४२३) २५८५००, खरेदी विभाग- २५८७७१, २५८७७२,
फॅक्स क्रमांक +९१-०२४२३-२५८८७०
Website – www.sai.org.in E-mail 1.saibaba@sai.org.in 2.purchase@sai.org.in

**मुंबई कार्यालय**-साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, दादर
मुंबई-४०० ०१४ दुरध्वनी क्रमांक (०२२२) २४१६६५५६


## श्री साईबाबा संस्थानचे साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाकरिता वुलन ब्लॅकेट पुरविणेबाबत फेर ई-निविदा (दुस-यांदा)

## श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

## निविदाधारकांसाठी सूचना

१. ई-निविदेसोबत सादर करावयाची कागदपत्रे, Technical Specifications व इतर शर्ती/अटींचा तपशील निविदा कागदपत्रामध्ये पुढे दिलेला आहे.

२. निविदा फी रक्कम रु.३,३००/- (रु.तीन हजार तीनशे मात्र) व बयाणा रक्कम रु. ५५,,०००/- (रू.पंचावन्न हजार) मात्र www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन भरावी.

३. पूर्ण माहिती भरलेली निविदा मुदतीत ऑनलाईन सादर करावयाची जबाबदारी निविदाधारकांची राहील.

४. सदर निविदा दि.१४/०१/२०१९ रोजी सकाळी ११.०० वा.पासून दि.४/२/२०१९ सायं. ०५.०० वा.पर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Downloading व Uploading साठी उपलब्ध राहील.

**५. ई-निविदेसोबत फक्त Online कागदपत्रे सादर करावयाची आहेत. Hard Copy मध्ये कागदपत्रे सादर करु नयेत. Hard Copy मध्ये सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही.**

६. सदर निविदा प्रक्रिया ही शासनाचे सुधारित खरेदी नियमावलीनुसार करण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

७. शक्य झाल्यास दि.०६/०२/२०१९ रोजी ई-निविदा Technical Bid उघडण्यात येईल. त्यातील Online Upload केलेली कागदपत्रे मागणीप्रमाणे असल्यास अशा निविदाधारकांचे Commercial Bid चा विचार करण्यात येईल.

८. Commercial Bid उघडणेचे दिवशी आपण किंवा आपले प्रतिनिधींनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. याकामी आपण आपली संपर्काबाबतची सर्व माहिती ऑनलाईन तांत्रिक निविदेसोबत सादर करावी. तसेच **Commercial Bid उघडणेसाठी उपस्थित राहणेकामी दुरध्वनीव्दारे कळविण्यात येईल.**

९. अपुर्ण निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

**१०. सदर ई-निविदेतील वुलन ब्लँकेटचे Technical Specifications पान नंबर २ व ३ मध्ये नमुद करण्यात आलेले आहेत. ते विचारात घेऊनच ई-निविदा भरावी.**

११. कोणतीही निविदा अंशत:/पुर्णपणे स्विकारणेचा अगर सर्व निविदा नाकारणेचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवला आहे. त्याबद्दलची कारणे देणे संस्थान व्यवस्थापनावर बंधनकारक राहणार नाही.

**(श्रीमती. रुबल अग्रवाल, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी

# Technical Specification

## SPECIFICATION FOR BLANKETS WOOLEN SUPERIOR DYED

### A : LABORATORY TESTING

1) **Table – 1**

### CONSTRUCTIONAL/MANUFACTURING PARTICULARS

| Sr.No. | Characteristics with test methods | Requirements with tolerance |
|---|---|---|
| 1 | Percentage composition, (%) (IS:2006)<br>Wool<br>Polyamide | <br>80 (+-2.5%)<br>20 (+-2.5%) |
| 2 | Fineness grade of Wool (IS 5910) | 58s |
| 3 | Average wool fibre diameter from finished blankets (Micron) | 25.60 (Max) |
| 4 | Count of woolen yarn (TC/Lab TM-11-02) (for guidance only)<br>Warp<br>Weft | <br>200 Text (approx)<br>200 Text (approx) |
| 5 | Threads per unit length, (per dm) (IS: 1963 : 1981)<br>Warp<br>Weft | <br>140 (+5% / -2.5%)<br>120 (+5% / -2.5%) |
| 6 | Mass per square meter (gms.): (TC/Lab TM-03)/ IS 1964 | 620 (+5% / -2.5%) |
| 7 | Breaking Load (N) (IS: 1969 :1985) (15cmx20cm. Ravelled Strips)<br>Warp<br>Weft | <br>1100 (+-2.5%)<br>900 (+-2.5%) |
| 8 | Dimension (IS: 1954 : 1990)<br>Length (cm)<br>Width (cm) | <br>230 (-2cm)<br>150 (-2cm) |
| 9 | Type of weave | 2/2 Twill |
| 10 | Thickness of finished | 3mm (min) |
| 11 | Mass per blanket under standard atmospheric condition (Kg) | 2.2 kg (+0.20kg/-0.5kg) |
| 12 | Colour of Blankets | As agreed between buyer and seller |

2) Table – 2

**CONSTRUCTIONAL/MANUFACTURING PARTICULARS OF POLYESTER SATIN PIPING AROUD THE BLANKET**

| Sr.No. | Characteristics with test methods | Requirements with tolerance |
|---|---|---|
| 1 | Composition | 100 % Polyester |
| 2 | Threads per inch<br>Warp<br>Weft | <br>872<br>336 |
| 3 | Mass Per linear meter (g) | 8.5 |
| 4 | Weave | Satin |
| 5 | Colour of Piping | Matching to colour of blanket |
| 6 | Stiches per dm | 20 |
| 7 | Type of thread | Filament yarn |
| 8 | Colour of thread | Matching to colour of piping |

3) Table – 3

**OTHER REQUREMENTS OF BLANKETS**

| Sr.No. | Characteristics with test methods | Requirements with tolerance |
|---|---|---|
| 1 | Colour Fastness to light (IS: 2454 : 1985)<br>(Xenon Arc lamp) (for blankets and piping)<br>Rating | <br><br>4 or better |
| 2 | Colour Fastness to Washing (IS/ISO 105-C10cA(1)),<br>40 deg. 30min (for blankets and piping)<br>Change in colour<br>Staining on….. | <br><br>4 or better<br>4 or better |
| 3 | pH of aqueous extract (IS 1390 Cold method) | 5.0 to 7.0 |
| 4 | % Dimensional changes (Relaxation), (%)<br>(IS:665:1989)<br>Wap<br>Weft | <br><br>4.0% Max<br>4.0% Max |
| 5 | Pilling Resistance (IS:10971) | 3 or better |

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)
## शिर्डी- ४२३ १०९. तालुका- राहाता, जिल्हा-अहमदनगर

## निविदेच्या शर्ती व अटी

१. वुलन ब्लँकेटचा तपशिल सोबतचे परिशिष्टात स्वतंत्र BOQ मध्ये दिलेला आहे. त्यात दर नमुद करुन निविदा ऑनलाईन भरावयाची आहे. निविदा भरताना ब्लँकेटचे पान.नं.२ व ३ मध्ये दिलेल्या Technical specifications चा विचार करुन निविदा भरावी.

२. निविदे सोबत दुकान नोंदणी दाखला, पॅन कार्ड, GST Number Certificate किंवा ऑनलाईन GST Number Registration Receipt, इ. सर्व कागदपत्रे स्कॅन करुन ऑनलाईन निविदेसोबत जोडावीत.

३. निविदा मंजुर झालेनंतर लेटर ऑफ इंटेन्ट देणेत येईल. त्यानंतर १५ दिवसांत वुलन ब्लँकेटचा टेक्निकल स्पेसिफिकेशनप्रमाणे १ नमुना लॅब रिपोर्टसह सादर करावा लागेल. तसेच वुलन ब्लँकेटसाठी विविध प्रकारच्या लेटेस्ट डिझाईनचे नमुने/अल्बम सादर करावे. संस्थानकडून गरजेनुसार शासकीय अथवा शासनमान्य लॅब तपासणी अगर उचित पुर्तता केल्यानंतर डिझाईन अंतिम करूनच पुरवठा आदेश देण्यात येईल. **पुरवठा आदेश दिलेनंतर १२० दिवसात सदर वुलन ब्लँकेटचा पुरवठा करावा लागेल.**

४. निविदाधारकाने निविदा सादर करताना GST कराचा बोजाचा विचार करुनच निविदा सादर करावी. निविदाधारकाने सदरचे दर हे सर्व कर व खर्चासह शिर्डी संस्थानचे भांडार विभागात पोहोच द्यावेत. GST, वाहतुक, हमाली, पॅकिंग व फॉरवर्डींग वगैरे कुठलाही खर्च वेगळा आदा केला जाणार नाही.

५. शासनाच्या खरेदी नियमावलीप्रमाणे ज्यांच्या निविदा मंजूर होतील त्यांना विहीत मुदतीत ब्लँकेट पुरविणेकामी हमी म्हणून मंजुर पुरवठा आदेशातील एकुण रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून संस्थानकडे अगोदर जमा करावी लागेल. निविदा मंजुर झाल्याचे कळविलेनंतर त्वरीत सदर रकमेचा भरणा करावा लागेल. ही सुरक्षा अनामत रक्कम व्यवस्थितरित्या सदर ब्लँकेटचा पुरवठा केलेनंतर परत केली जाईल. सुरक्षा अनामत अगर बयाणा रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही. तसेच शिर्डी येथे समक्ष येऊन रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर त्वरित करारनामा नोटरी करुन देणे बंधनकारक राहील. **करारनाम्याची नोटरी फी निविदाधारकास आदा करावी लागेल.**

६. सदरच्या पुरवठ्यापोटी आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

७. निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्पयावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

८. राज्याबाहेरील निविदाकाराची निविदा मंजुर झाल्यास शासन खरेदी नियमावलीतील नियम क्र. ३.१.२.८ नुसार राज्याबाहेरील पुरवठादार जर न्यूनतम असला व महाराष्ट्र राज्यातील पुरवठादार द्वितीय न्यूनतम असला तर महाराष्ट्र राज्यातील पुरवठादारांना प्रोत्साहन देण्यासाठी, महाराष्ट्र राज्यातील द्वितीय न्यूनतम दरधारक जर न्यूनतम दर धारकाच्या दरात माल पुरविण्यास तयार असेल तर एकूण खरेदी करावयाच्या मालाच्या ५० टक्के मालाचा पुरवठा आदेश राज्यातील पुरवठादारांना देण्यात येतील व जर तयार नसतील तर पूर्ण मालाचा पुरवठा आदेश राज्याबाहेरील पुरवठादारांना देण्यात येईल.

९. शासन नियमानुसार वेळोवेळी लागू होणारे कर पुरवठाधारकावर बंधनकारक राहतील व त्याप्रमाणे रक्कम बीलातून कपात करण्यात येईल. शासनाने १ ऑक्टोबर २०१८ पासून करपात्र वस्तु/सेवा अथवा दोन्हीसाठी पुरवठादाराला करावयाचे प्रदानातुन २% TDS वजा करणेबाबत परिपत्रक क्रं.२०१८०९२८१७१४३६६६०५ अन्वये निर्देशित केले आहे. त्यानुसार संस्थानकडून बीलातून टॅक्स वसुल केला जातो. त्याचाही निविदा भरतांना निविदाधारकाने विचार करावा. याबाबतची आधिक माहिती महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**१०. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो राहाता/कोपरगाव कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.**

११. निविदाधारकांच्या अटी/शर्ती संस्थानवर बंधनकारक राहणार नाहीत.

१२. कोणतीही निविदा मंजुर अथवा नामंजुर करण्याचा अगर सर्व निविदा नाकारण्याचा हक्क संस्थानने राखून ठेवला आहे.

१३. सदर ई-निविदेचा वैधता कालावधी Technical Bid उघडल्यानंतर १८० दिवसांचा राहील.

१४. वुलन ब्लॅकेटचा पुरवठा झालेनंतर त्याचे बील संबंधीत विभागाचे अभिप्रायानंतर ३० दिवसांत संस्थानकडून आदा करण्याचा प्रयत्न राहिल. सदरच्या पुरवठ्याबाबत आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

**१५. पुरवठा केलेल्या ब्लॅकेटचा नमुना संस्थानने दिलेले स्पेसिफिकेशप्रमाणे आहे किंवा नाही याबाबत खात्री करण्यासाठी गरजेप्रमाणे लॅब तपासणीसाठी पाठविणेत येईल.**

१६. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. निविदाधारकाची कोणतीही अट/अटी संस्थानवर बंधनकारक राहणार नाही, अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

१७. सदर निविदा प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचा अधिकार संस्थानने राखून ठेवण्यात आला आहे.

**आपत्ती/ नैसर्गिक आपत्ती, नुकसान भरपाई व दंडात्मक कारवाईबाबतची तरतुद :-**

१८. पुरवठा आदेशातील वुलन ब्लॅकेट मुदतीत पुरविले नाहीत तर पुरवठा आदेशाचे Quantity चे एकुण किंमतीचे ०.५ % ते ५ % पर्यंत दंड करण्यात येईल व सदर दंडाची वसुली आपले बिलातून अगर सुरक्षा अनामत रकमेतून करण्यात येईल.

अ) पुरवठा न केलेल्या ब्लॅकेटची किंमत रु.२.०० लाखापेक्षा कमी असल्यास – प्रती आठवडा ०.५ % दराने जास्तीत जास्त १० % पर्यंत

आ) पुरवठा न केलेल्या ब्लॅकेटची किंमत रु.२.०० लाखापेक्षा जास्त असल्यास – प्रती आठवडा ०.५ % दराने जास्तीत जास्त ५ % पर्यंत

मात्र विलंबाने पुरवठा केलेला माल स्विकारण्याचे बंधन संस्थानवर राहणार नाही.

१९. ब्लॅकेटचा पुरवठा न झाल्यास, अगर दिलेल्या **Technical Specifications** प्रमाणे नसल्यामुळे ते नाकारले गेल्यास संस्थानची अडचण होऊ नये म्हणून, संस्थानला बाजारभावाने आवश्यक तितके किंवा दिलेल्या पुरवठा आदेशाइतके ब्लॅकेट्स दुसरीकडून खरेदी करण्याची मुभा राहील. अशा खरेदी केलेल्या ब्लॅकेटसाठी जादा लागलेल्या रकमेची (फरकाची) भरपाई निविदाधारकाने संस्थानला करुन दयावयाची आहे. सदरची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अगर पुर्वीच्या/नंतरच्या आलेल्या मालाच्या बिलातून वसुल करण्याचा अधिकार संस्थानला राहील.

२०. निविदेतील मंजुर दराने व पुरवठा आदेशाप्रमाणे सदर ब्लॅकेटचा पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजुर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पुरवठाधारकाने ब्लॅकेटचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा पुरवठा न केल्यास संस्थानला बाजारभावाने अथवा फेरनिविदा मागणी करुन सदर ब्लॅकेट खरेदी करावे लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई पुरवठाधारकाकडून वसुल केली जाईल.

२१. निविदा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/ नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी निविदाधारकांच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा.युद्ध, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भूकंप वगैरे) पुरवठाधारक ब्लॅकेटचा पुरवठा करु शकला नाही व तसे निविदाधारकाने त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरुप मा.व्यवस्थापन समिती/मा.उप समिती/मा.मुख्य कार्यकारी अधिकारी घेतील तो निविदाधारकावर बंधनकारक राहिल.

(श्रीमती. रुबल अग्रवाल, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी

# निविदाधारकाबाबत माहिती

| | | |
|---|---|---|
| १. | फर्मचे नांव- | ------------------------------------------------ |
| २. | पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता- | ------------------------------------------------ |
| ३. | दूरध्वनी क्रमांक- | ------------------------------------------------ |
| | ऑफीस- | ------------------------------------------------ |
| | दुकान- | ------------------------------------------------ |
| | निवास- | ------------------------------------------------ |
| | मोबाईल नंबर- | ------------------------------------------------ |
| | फॅक्स नंबर- | ------------------------------------------------ |
| | ई –मेल | ------------------------------------------------ |
| ४. | संपर्कासाठी व्यक्तीचे नांव- | ------------------------------------------------ |
| | दूरध्वनी/ मोबाईल क्रमांक- | ------------------------------------------------ |
| ५. | मालकाचे/भागीदारांची नावे | १. ------------------------------------------------ |
| | | २. ------------------------------------------------ |
| ६. | बॅंक खाते नांव | १.------------------------------------------------ |
| | शाखा | २. ------------------------------------------------ |
| | खाते नंबर व प्रकार | ३.------------------------------------------------ |
| | आयएफएससी कोड | ४.------------------------------------------------ |

दिनांक :-    /    /२०१८

ठिकाण :-    निविदाधारकाची सही व शिक्का

## अ) Technical Bid मधील कागदपत्रे (चेक लिस्ट)

१. अद्ययावत दुकान नोंदणी दाखला/उत्पादक परवाना/ स्थानिक स्वराज्य संस्था परवाना (उदा.ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगर पालिका) अगर तत्सम शासकीय परवाना

२. GST नोंदणी क्रमांक प्रमाणपत्र किंवा ऑनलाईन GST क्रमांक पावती

३. पॅन कार्ड

दिनांक - / /२०१८
ठिकाण -

प्रति,
**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)
शिर्डी, ता.राहाता, जिल्हा-अहमदनगर.

**विषय – श्री साईबाबा संस्थानचे साईबाबा भक्तनिवासस्थान विभागासाठी वुलन ब्लँकेट पुरविण्याची ई-निविदा**

महोदय,

मी/आम्ही खालील सही करणार कळवितो की, वरील विषयाबाबत आपण प्रसिद्ध केलेली ई-निविदा वाचली. आपल्या निविदेत दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून मला /आम्हाला मान्य आहेत. आपले अटी/शर्तींचे पालन करावयाचे मी/आम्ही मान्य करीत आहे/आहोत.

मी/आम्ही आपणांस निविदेमध्ये नमुद केलेल्या ब्लँकेटचा, आपल्या मागणीप्रमाणे उपरोक्त कालावधीकरिता, संस्थानचे आवश्यकतेनुसार, आवश्यक त्यावेळी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांचे भांडार पोहोच करण्याची हमी देतो. सदर ब्लँकेटची संस्थानला गरज पडल्यास वेळ प्रसंगी नमुद केलेल्या परिमाणापेक्षा २५% पर्यंत जास्त ब्लँकेटची संस्थानकडून मागणी झाल्यास मी/आम्ही तो मंजुर दराने पुरविण्याची हमी देत आहे/आहोत.

ब्लँकेटची निविदा मंजुर होतील, त्या मान्य दराने ब्लँकेटचा पुरवठा करण्याची हमी म्हणून, मंजुर पुरवठा आदेश एकुण रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून संस्थानने कळविल्यानंतर त्वरित मी/आम्ही रोख भरणा करु. बयाणा रक्कम सुरक्षा अनामत खाती वर्ग करण्यास माझी संमती आहे. तसेच यानंतरही सुरक्षा अनामत रक्कम पुर्ण होऊ शकली नाही, तर उर्वरीत सुरक्षा अनामत रक्कम रोख/डी.डी./RTGS/NEFT व्दारे भरु. तसेच रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा नोटरी करुन देऊ व त्याप्रमाणे मंजूर दराने निविदा कालावधीत मान्य नमुन्याप्रमाणे ब्लँकेट्स वेळेवर शिर्डी येथील मध्यवर्ती भांडार विभागात पोहोच करणे आमचेवर बंधनकारक राहील.

दिनांक - / /२०१८
ठिकाण -

आपला/आपले विश्वासू,

फर्मचे मालकाचे/भागीदाराचे नांव

सही/सहया व शिक्का

(१) ----------------------------------

(२) ----------------------------------

**सोबत-** कागदपत्रे

| Requirement of Woolen Blankets | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Description** | **Quantity** | **Unit** | **Rate per Nos.** | **Total Amount** |
| 1 | **WOOLEN BLANKETS**<br>Size- 230cm X 150cm<br>**(As Per Technical Specifications Noted On Page No.2 & 3 of the Tender Document)** | 5,000 | Nos. | | |

**(Smt.Rubal Agarwal, IAS)**
**Chief Executive Officer**
Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi